नियत सेवावधीस सेवानिवृत्त होताच भविष्य-निर्वाह निधी वर्गणीदारांस त्यांची भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम त्वरित प्रदान करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन निर्णय क्रमांक : भनिनि-११८५/प्र. ५२/तिरा-अ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २८ मे १९८६

### शासन निर्णय

भविष्यनिर्वाह निधी (सर्वसाधारण आणि अंशदायी) नियमावलीतील अनुक्रमे नियम २८ व २३ च्या तरतुदीनुसार वर्गणीदारास त्याच्या भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम, त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या दुसऱ्या दिवशी देय होते. मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमावलीतील नियम ३१ (१) व अंशदायी भविष्यनिर्वाह निधी (मुंबई) नियमावलीतील नियम २७ (१) अनुसार वर्गणीदाराच्या खात्यात जमा असलेली रक्कम वर्गणीदाराला प्रदेय झाल्यानंतर, ती याबाबत त्याच्याकडून लेखी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, त्याला प्रदान करणे हे लेखा अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. उपरोल्लिखित दोन्ही नियमावलीतील अनुक्रमे नियम ३१ (३) व २७ (३) अनुसार, वर्गणीदाराने नियत वयोमान प्राप्तीनंतर **सेवानिवृत्त होण्याच्या तारखेच्या एक वर्ष आधी** भविष्य निर्वाह निधीतील आपली रक्कम अंतिमतः मिळण्यासाठी लेखा अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करावयाचा आहे. असा अर्ज लेखा अधिकाऱ्याला प्राप्त झाल्यानंतर संबंधित लेखा अधिकाऱ्याने त्या अर्जात दर्शविलेली त्या वर्गणीदाराच्या भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा असलेली रक्कम प्रदान करण्याबाबतचे प्राधिकारपत्र, त्या वर्गणीदाराच्या **नियत वयोमान प्राप्तीच्या तारखेच्या कमीत कमी एक महिना अगोदर** पाठवावयाचे आहे. मात्र, प्रत्यक्षात सदर रक्कम ही त्या वर्गणीदाराला त्याच्या नियत वयोमान प्राप्तीच्या तारखेनंतर **ताबडतोब** प्रदान केली जावयाची आहे.

२. वर्गणीदाराच्या सेवेच्या अखेरच्या वर्षातील वर्गणी व अग्रिमाच्या परताव्यादाखल जमा होणारी रक्कम वर्गणीदाराला त्याच्या सेवानिवृत्तीनंतर त्याने दुसरा स्वतंत्र अर्ज केल्यानंतर प्राधिकृत केली जाते.

३. भविष्यनिर्वाह निधीच्या नियमावलीत वरील तरतुदी केल्या असल्या तरी सर्वसाधारणपणे असा अनुभव येतो की, वर्गणीदाराला ह्या रकमा वेळेवर मिळत नाहीत. तेव्हा ह्या रकमा, विशेषतः परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेली रक्कम, वर्गणीदाराला तो नियत वयोमान प्राप्ती दिनांकाला सेवानिवृत्त झाल्यानंतर ताबडतोब मिळण्यासाठी जी सध्याची कार्यपद्धती आहे ती अधिक सुलभ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत काळजीपूर्वक विचार केल्यानंतर शासन पुढील कार्यपद्धती विहित करीत आहे :—

(१) वर्गणीदाराने भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम मिळण्यासाठीचा अर्ज नियत वयोमान प्राप्तीनंतरच्या **सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी एक वर्ष अगोदर** लेखा अधिकाऱ्याकडे सादर करण्याची सध्याची कार्यपद्धती यापुढेही तशीच चालू ठेवण्यात येत आहे.

(२) नियत वयोमान प्राप्तीनंतर सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदाराने त्याच्या सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यात भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी भरू नये. अशा प्रकारे सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यात भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी न भरणे हे प्रत्येक वर्गणीदाराला सक्तीचे असेल.

(३) वर्गणीदाराने परतावा अग्रिम घेतलेले असेल तर नियत वयोमान प्राप्तीनंतर सेवानिवृत्ती होताना त्याच्या सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यांत त्याने घेतलेल्या अग्रिमाच्या परतफेडीच्या हप्त्यांची रक्कम वसूल करण्यात येऊ नये.

(४) नियत वयोमान प्राप्तीनंतर सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदारास त्याच्या सेवेच्या शेवटच्या तीन महिन्यांत परतावा अग्रिम किंवा ना परतावा रक्कम मंजूर करण्यात येऊ नये. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत वर्गणीदारास त्या कालावधीत ना परतावा रक्कम मंजूर करणे आवश्यक आहे अशी सक्षम मंजुरी प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास त्या कालावधीत त्याला ना परतावा रक्कम मंजूर करता येईल. मात्र ही मंजूर करण्यात येणारी ना परतावा रक्कम महालेखापालांनी प्राधिकृत केल्याखेरीज काढण्यात येऊ नये. तसेच याप्रमाणे ना परतावा रक्कम मंजूर केल्यामुळे वर्गणीदारास भविष्य निर्वाहनिधीची रक्कम अंतिमतः प्रदान करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी त्या वर्गणीदाराची असेल.

(शा.म.मु.) एच ७१७ (५०१०—६—८६)

(५) मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमावलीतील नियम ३१-अ व अंशदायी भविष्यनिर्वाह निधी (मुंबई) नियमावलीतील नियम २५-अ खालील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या ठेव निगडीत विमा (डिपॉझिट लिंक्ड, इन्शुअरन्स) योजनेच्या प्रयोजनासाठी नियत सेवावधीस सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदाराने, सेवेच्या अखेरच्या तीन महिन्यांमध्ये भविष्यनिर्वाह निधीमध्ये वर्गणी जरी भरलेली नसली तरी नियत वयोमान प्राप्तीच्या तारखेपर्यंत तो भविष्यनिर्वाह निधीचा वर्गणीदार आहे असे समजण्यात येईल. अर्थातच त्या शेवटच्या तीन महिन्यांच्या कालावधीत जरी त्या वर्गणीदाराच्या दुर्देवाने त्याचा मृत्यू झाला तरीसुद्धा त्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेल्या रकमेबरोबर नियम ३१-अ किंवा २५-अ खालील ठेव निगडीत विमा योजनेखाली अनुज्ञेय असलेली रक्कम, त्याची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम मिळण्यास, जी व्यक्ती/ज्या व्यक्ती पात्र ठरतील तिला/त्यांना प्रदान करण्यात येईल.

(६) भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम वर्गणीदाराच्या वेतनातून वजा करून घेतल्यानंतर लगेच वर्गणीदाराने वर परिच्छेद ३ (१) मध्ये नमूद केलेल्या अर्जाच्या कक्षेत न आलेल्या, वर्गणी व अग्रिमाच्या परताव्या दाखल भरलेल्या रकमेच्या मागणीसाठी दुसरा अर्ज सादर करावयाचा आहे.

(७) वर्गणीदाराच्या नियत सेवावधीच्या तारखेच्या एक वर्ष आधी भविष्यनिर्वाह निधीची अंतिम रक्कम मिळण्यासाठीचा अर्ज त्याच्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जात नमूद केलेल्या कालावधीपर्यंतचा हिशेब लेखा अधिकारी पडताळून पाहील. तसेच दुसरा अर्ज प्राप्त झाल्यानंतर राहिलेल्या नऊ महिन्यांचा हिशेब पडताळून पाहील आणि **सेवानिवृत्तीच्या कमीत कमी एक महिना अगोदर** रक्कम वर्गणीदारास आदा करण्याचे प्राधिकारपत्र निर्गमित करील. मात्र प्रत्यक्षात, त्या रकमेचे प्रदान त्या वर्गणीदाराला त्याच्या प्रत्यक्ष सेवानिवृत्तीनंतरच करण्यात येईल.

(८) भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम अंतिमतः मिळण्यासाठी सादर करावयाच्या अर्जाचा सुधारित नमुना सोबत जोडला आहे. हे अर्ज दोन प्रतीत करण्यात यावेत.

४. वर परिच्छेद तीनमध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा मुख्य उद्देश वर्गणीदाराच्या भविष्यनिर्वाह निधीतील रकमेच्या हिशेबाचे वेळीच पुनर्विलोकन व पडताळणी करणे आणि आवश्यक तर तो सुधारून पुनः लिहिणे आणि तो त्याच्या नियत वयोमान प्राप्तीनंतर सेवानिवृत्त होण्याच्या तारखेच्या पुरेशा आधी पूर्ण करणे लेखा अधिकाऱ्यास शक्य व्हावे, हा आहे ह्यासाठी भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम मिळण्यासाठीच्या अर्जाचा पहिला भाग प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची कार्यवाही म्हणजे सापडत नसलेल्या जमा रकमांचा (मिसिंग क्रेडिटस्) शोध घेणे, (आवश्यकता असल्यास) हिशेबाचे पुनर्लेखन करणे इत्यादी सर्व कार्यवाही लेखा अधिकाऱ्याने ताबडतोब सुरू करून हिशेब पूर्ण व अद्ययावत करावेत आणि भविष्यनिर्वाह निधीतील वर्गणी. दाराला प्रदेय असलेली रक्कम वेळीच प्राधिकृत करावी म्हणजे वर्गणीदाराची भविष्यनिर्वाह निधीतील संपूर्ण रक्कम त्याला त्याच्या नियत सेवावधीच्या तारखेस किंवा त्यानंतर ताबडतोब मिळू शकेल.

५. हे आदेश १ जून १९८६ पासून अंमलात येतील म्हणजे ३१ ऑगस्ट १९८६ रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदारांनी जून, जुलै व ऑगस्ट १९८६ मध्ये भविष्यनिर्वाह निधीत वर्गणी भरणे आवश्यक राहणार नाही. त्यानंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेअगोदर ३ महिने भविष्य निर्वाह निधीची वर्गणी भरणे बंद करावे.

६. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख ह्यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की त्यांनी हे आदेश त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या नजरेस आणावेत.

७. मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी व अंशदायी भविष्यनिर्वाह निधी (मुंबई) या नियमावलीतील विद्यमान तरतुदी प्रस्तुत निर्णयाच्या तरतुदींच्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल व संबंधित नियमात यथावकाश सुधारणा करण्यात येईल

८. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-६०४/८६, दिनांक २५ एप्रिल १९८६ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र : अर्जाचा नमुना

ग. गं. बेलवलकर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

४०० / ३२५ १००० / ४५० ८३५ - २५ - ९८ -

५

## नमुना

(दोन प्रतींत सादर करावयाचा)

**(राजपत्रित व अराजपत्रित अशा दोनही प्रकारच्या कर्मचाऱ्यांसाठी)**

सर्वसाधारण/अंशदायी भविष्य निर्वाह निधी लेख्यातील शिल्लक रकमेचे अंतिम प्रदान करण्यासाठी/नियम निकायांकडे (बॉडी कॉर्पोरेटस्)/इतर शासनाकडे तिचे हस्तांतरण करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना.

प्रति

महालेखापाल,

..........................

(.................................. यांच्यामार्फत)

महोदय, मी खाली सही करणार श्री./श्रीमती/कु. .................................. असा अर्ज करतो/करते, की मी दिनांक ...................... रोजी नियत वयोमान प्राप्तीमुळे सेवानिवृत्त होणार आहे/सेवानिवृत्त झालो/झाले आहे. दिनांक ...................... पासून सेवानिवृत्तीपूर्व रजेवर गेलो/गेले आहे आणि त्या रजेच्या समाप्तीनंतर .......... रोजी सेवानिवृत्त होणार आहे/मला सेवामुक्त करण्यात आले आहे/बडतर्फ करण्यात आले आहे. दिनांक ......... ......... पासून ...................... ह्या कार्यालयात माझे कायमचे समावेशन झाले आहे. मी माझ्या सेवेचा दिलेला राजीनामा स्वीकृत झाल्याने दिनांक ...................... पासून सेवामुक्त होत आहे/ ................. यांच्याकडील नेमणूक झालेल्या पदावर रुजू होण्यासाठी मी माझ्या शासन सेवेतील ................ ह्या पदाचा राजिनामा दिला आहे आणि दिनांक ...................... रोजी मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर माझा राजिनामा स्वीकारण्यात आला आहे. मी ...................... यांच्याकडील सेवेत ................ रोजी मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर रुजू झालो/झाले आहे.

२. माझा सर्वसाधारण /अंशदायी भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक ............ हा आहे.

३. मी माझ्या कार्यालयातून रक्कम घेऊ इच्छितो/इच्छिते. माझ्या वैयक्तिक ओळख चिन्हांचा तपशील (निरक्षर वर्गणीदाराच्या बाबतीत) डाव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा व बोटांचे ठसे आणि (साक्षर वर्गणीदारांच्या बाबतीत) सहीचा नमुना, याच्या, शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्याने यथोचितरीत्या अनुप्रमाणित केलेल्या दोन प्रती यासोबत जोडल्या आहेत.

### भाग एक

(अंतिम प्रदानासाठीचा अर्ज, सेवानिवृत्त होण्यापूर्वी एक वर्ष आधी करावयाचा असेल त्यावेळी भरावयाचा)

४. मला देण्यात आलेल्या ...... वर्षाच्या लेखा विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे/आपल्या कार्यालयात ठेवण्यात येणाऱ्या खातेवही लेख्यानुसार माझ्या भविष्य निर्वाह निधी लेख्यात रु. ............ (अक्षरी रु. .................. फक्त) इतकी रक्कम जमा होती. मी आपणास विनंती करतो/करते की कृपया माझ्या भविष्यनिर्वाह निधी लेख्याचे पुनर्विलोकन/पुनर्लेखन (आवश्यक असल्यास) करून तो अद्ययावत करण्यात यावा.

५. खाली नमूद केलेल्या आयुर्विमा पत्रांसाठी रक्कम भरण्याची वित्त व्यवस्था मी माझ्या भविष्यनिर्वाह निधी लेख्यातून केलेली होती :—

| विमापत्राचा क्रमांक | कंपनीचे नाव | विम्याची रक्कम |
|---|---|---|
| (१) | | |
| (२) | | |
| (३) | | |

६. मी असे नमूद करतो/करते की, माझ्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची शेवटची रक्कम वजा केल्यानंतर तावडतोब मी ह्या अर्जाचा भाग दोनमध्ये दुसरा अर्ज सादर करीन.

आपला/आपली,

स्थळ :

दिनांक :

वर्गणीदाराची सही, नाव, पदनाम व पत्ता.

(कार्यालय प्रमुखाच्या वापरासाठी)

क्रमांक :
पत्ता व दिनांक इत्यादी

महालेखापाल ............................. यांच्याकडे आवश्यक त्या सत्वर कार्यवाहीसाठी रवाना.

२. श्री./श्रीमती/कु. ............................. (त्यांना दरवर्षी देण्यात आलेल्या विवरणपत्रांच्या पडताळणी-नुसार) यांचा भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक ............... हा आहे.

३. श्री./श्रीमती/कु. ............................. हे/ह्या .................... रोजी शासकीय सेवेतून निवृत्त होणार आहेत.

४. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ...................... यांनी घेतलेली परतावा अग्रिम रक्कम खाली नमूद केली आहे. या रकमेपैकी रुपये ............ चे ............ हप्ते अद्याप वसूल व्हावयाचे आहेत व ती रक्कम भविष्य निर्वाह निधी लेख्यात जमा व्हावयाची आहे.

वर नमूद केलेल्या भविष्य निर्वाह निधी लेखा विवरणपत्रात दर्शवलेल्या कालावधीनंतर तात्पुरत्या व ना-परतावा काढण्यास मंजुरी दिलेल्या रकमांचा तपशील पुढे नमूद केला आहे :—

| काढलेला परतावा अग्रिम रकमा | | काढलेल्या ना-परतावा रकमा | |
|---|---|---|---|
| कार्यालयीन आदेशाचे क्रमांक व तारीख | रक्कम | कार्यालयीन आदेशाचा क्रमांक व तारीख | रक्कम |
| (१) | | | |
| (२) | | | |
| (३) | | | |

.......................
कार्यालय प्रमुखाची सही व पदनाम

प्रत,

श्री/श्रीमती/कु. ............................. यांना माहितीसाठी अग्रेषित.

## भाग दोन

(दोन प्रतींत सादर करावयाचा)

(वर्गणीदाराच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम कापून घेतल्यानंतर त्याने लगेच सादर करावयाचा आहे. हा भाग नियत सेवावधीनंतर सेवेतून काढून टाकल्यानंतर/राजिनामा दिल्यानंतर अंतिम रक्कम मिळण्यासाठी प्रथम अर्ज सादर करणाऱ्या वर्गणीदारांनाही लागू आहे).

मी, भविष्य निर्वाह निधीमधील शिल्लक रकमेच्या अंतिम प्रदानासाठी दिनांक ................ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अशी विनंती करतो/करते की माझ्या लेख्यात शिल्लक असलेली संपूर्ण रक्कम व नियमानुसार तिच्यावर देय असलेले व्याज व बोनस ह्यासह मला देण्यात यावी.

किंवा

मी अशी विनंती करतो/करते की, माझ्या लेख्यातील संपूर्ण जमा रक्कम व तिच्यावर देय असलेले व्याज व बोनस ह्यासह मला देण्यात यावी/.............................. कडे हस्तांतरित करण्यात यावी.

आपला/आपली,

स्थळ :

................

दिनांक :

वर्गणीदाराची सही, नाव, पदनाम व पत्ता.

---

(कार्यालय प्रमुखाच्या वापरासाठी)

क्रमांक :

पत्ता, दिनांक इत्यादी

महालेखापाल, ......................... यांच्याकडे आवश्यक त्या सत्वर कार्यवाहीसाठी रवाना/पृष्ठांकन क्रमांक ................ दिनांक ............... च्या अनुषंगाने आवश्यक त्या सत्वर कार्यवाहीसाठी रवाना.

२. श्री/श्रीमती/कु. ............................. ह्या दिनांक ............ पासून अंतिमरीत्या सेवानिवृत्त व्हावयाचे/व्हावयाच्या आहेत व दिनांक ............ पासून ............ दिवसांच्या सेवानिवृत्तीपूर्व रजेवर गेले/गेल्या आहेत/सेवामुक्त करण्यात आले आहे/यांना बडतर्फ करण्यात आले आहे/यांची ........................ ह्या कार्यालयात कायमची बदली करण्यात आली आहे/यांनी शासकीय सेवेतून अंतिमरीत्या राजिनामा दिला आहे आणि तो दिनांक ............ पासून स्वीकारण्यात आला आहे/यांनी ............ मधील ............... पदावर रुजू होण्यासाठी विहित नियमानुसार शासनाच्या सेवेतील ............ या पदाचा राजीनामा दिला आहे आणि तो राजीनामा दिनांक ............ रोजी मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर स्वीकारण्यात आला आहे. श्री/श्रीमती/कु. .................. .............. मधील सेवेत दिनांक ............... रोजी मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर रुजू झाले आहेत/झाल्या आहेत

३. श्री/श्रीमती/कु. ......................... यांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम रुपये ........./कोषागार रोख प्रमाणक क्रमांक .......... अन्वये या कार्यालयाचे रुपये ............/ (रुपये ..................... फक्त) इतक्या रकमेचे देयक क्रमांक .......... दिनांक ................. [illegible] ण्यात आली होती. त्यापैकी वर्गणीची रक्कम रु. .......... इतकी होती आणि अग्रिमाच्या परताव्याची रक्कम [illegible] .......... इतकी होती. .

४. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ........................ यांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम वजा करून घेण्यात आल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या नऊ महिन्यांच्या कालावधीत त्यांना परतावा अग्रिम किंवा ना-परतावा रक्कम काढण्यास मंजूरी देण्यात आली नव्हती.

किंवा

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ............................ यांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम वजा करून घेण्यात आल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या नऊ महिन्यांत खाली नमूद केल्याप्रमाणे परतावा अग्रिम/ना-परतावा रक्कम काढण्यास मंजूरी देण्यात आली होती आणि सदर रक्कम त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीतून काढून त्यांना ती प्रदान करण्यात आली होती.

| | आदेश क्र. | अग्रिम/ना-परतावा रक्कम | दिनांक | व्हाऊचर क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | | | | |
| (२) | | | | |
| (३) | | | | |

५. आणखी असेही प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ............................ यांच्या वेतनातून भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीची शेवटची रक्कम वजा करून घेण्यात आल्याच्या/सेवानिवृत्तीपूर्व रजेवर जाण्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या नऊ महिन्यांत विम्याचे हप्ते भरण्यासाठी त्यांच्या/तिच्या भविष्यनिर्वाह निधीतून कोणतीही रक्कम काढण्यात आली नव्हती/पुढील रकमा काढण्यात आल्या होत्या :—

| | आदेश क्र. | रक्कम | दिनांक | व्हाऊचर क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | | | | |
| (२) | | | | |
| (३) | | | | |

६. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ............................ यांच्याकडून शासनाची कोणतीही रक्कम वसूल करावयाची राहिलेली नाही.

७. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ............................ यांनी राज्य शासनाच्या इतर विभागात किंवा दुसऱ्या शासनाच्या सेवेत किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासन नियंत्रित अशा एखाद्या निगम निकायामध्ये (बॉडी कॉर्पोरेट) किंवा केंद्र शासनामध्ये नेमणूक होण्यासंबंधात राज्य शासनाची पूर्व परवानगी घेऊन शासनाच्या सेवेचा राजीनामा दिलेला नाही.

....................

कार्यालय प्रमुखाची सही व पदनाम.

---

प्रत,

श्री/श्रीमती/कुमारी ........................... यांना माहितीसाठी अग्रेषित.